# इतीवृत

या कार्यालयाचे आदेश क्रमांक जाक्र /जि/प/वा/आस्था-३/२०३४/२०२० दिनांक २३/०७/२०२० अन्वये सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत कार्यरत संवर्गातील पदोन्नतीची रिक्त असलेली पदे सेवा जेष्टतेनुसार पदोन्नतीने भरण्याकरीता शासनाचे संदर्भिय पत्रातील सुचनेनुसार पदोन्नती करणे करीता कर्मचाऱ्यांचे पदोन्नती करणे करीता गठीत करण्यात आलेल्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. वाशिम यांचे अध्यक्षतेखालील पदोन्नती प्राथमीक तपासणी चोकशी समितीने शिफारस केल्यानुसार सेवा जेष्टतेनुसार , शासन निर्णय, आदेश तसेच परीपत्रकातील निर्देशानुसार कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे करीता संभाव्य कर्मचाऱ्यांची पदोन्नती यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर संभाव्य पदोन्नती यादी मधिल कर्मचाऱ्यांचे, पदोन्नतीवर निवडीबाबत काही आक्षेप असल्यास सदर आक्षेपावर माझे कक्षात दिनांक २७/०७/२०२० रोजी टिक ११.०० वाजता सुनावणी आयोजीत केली होती. सदर सुनावणी करीता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), कनिष्ठ प्रशासन अधिकारी व आक्षेप दाखल करणारे कर्मचारी उपस्थित होते. त्यानुसार सदर यादीवर खालील प्रमाणे एक आक्षेप प्राप्त झाला. तसेच श्री.आर.एस.भगत, वरिष्ठ सहाय्यक यांनी कनिष्ठ प्रशासन अधिकारी या पदावर खुल्या प्रवर्गातुन पदोन्नती मिळणे बाबत विनंती केली आहे. त्या प्रकरणी सुध्दा सुनावणी घेण्यात आली

| अक्र. | आक्षेप घेणा-या कर्मचा-याचे नाव व थोडक्यात विवरण | सुनावणी मध्ये घेण्यात आलेला निर्णय | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.एम.जी.नायक वरिष्ट सहाय्यक, सदर यादीमध्ये अनुक्रमांक ०५ वर दर्शविल्या विरुध्द माझ्यावर जि.प.स्तरावर कोणत्याही प्रकारची खाते चौकशी प्रलंबित किंवा सुरु नसल्यामुळे पदोन्नती पासुन वंचित ठेवण्यात येवु नये तसेच देण्यात आलेली शिक्षा हि मोठया प्रमाणात असल्याचे मत असल्यामुळे मा.विभागीय आयुक्त यांचेकडे न्यायची मागणी केली आहे. | या कार्यालयाचे आदेश क्रमांक जाक्र.जिपवा/साप्रवि/खाचौ/३२७९/२०१९ दिनांक २०/०७/२०१९ अन्वये श्री.एम.जी.नायक वरिष्ठ सहाय्यक, यांची दहा वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी थोपविणे बाबत शिक्षा देण्यात आलेली असल्यामुळे मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज दाखल केला आहे. करीता प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय दिनांक १५ डिसेंबर २०१७ नुसार सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल.<br>पदोन्नतीस पात्र उमेदवार पैकी शेवटच्या उमेदावराच्या पदोन्नती आदेशामध्ये श्री.एम.जी.नायक वरिष्ठ सहाय्यक यांचे अपिल प्रकरणी प्राप्त निर्णयाचे अधिन राहुन नियुक्ती प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशानंतर शासन निर्णय व परीपत्रकाचे अनुषगाने पदोन्नती देणे बाबतची अट नमुद करणे करीता निर्देश दिले. तसेच अपील प्रकरणी निर्णय प्राप्त नंतर नियुक्ती प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशानंतर शासन निर्णय/शासन पत्र नुसार नस्ती सादर करणे बाबत सामान्य प्रशासन विभाग जि. प. वाशिम यांना निर्देश दिले. | |
| ०२ | श्री.आर.एस.भगत, वरिष्ट सहाय्यक, दिनांक ०१/१०/२००३ पासुन वरिष्ट सहाय्यक पदाची मानवि दिनांक पुर्वीलक्षी प्रभावाने खुल्या प्रवर्गाच्या कोटयातुन पदोन्नती मिळणे | श्री.आर.एस.भगत वरिष्ठ सहाय्यक, यांनी सदर यादीवर आक्षेप घेतलेला नसुन पदोन्नती मिळणे बाबत वारंवार अर्ज करीत | |

| | | | |
|---|---|---|---|
| | बाबत. | असल्यामुळे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांनी सुनावणी घेण्याबाबत निर्णय घेतला. सदर सुनावणीत श्री.भगत व.स. यांना विचारणा केली असता यादीवर आक्षेप न घेतल्याबाबत नमुद करत पदोन्नती मिळणे बाबत विनंती केली.<br>संबधिताचे विनंती नुसार मा.विभागीय आयुक्त यांना या पुर्वि दोन वेळा मार्गदर्शन मागविण्यात आले त्यामध्ये शासन पत्रानुसार कार्यवाही करणे बाबत नमुद करण्यात आलेले असल्यामुळे स्पष्ट निर्देश प्राप्त नाही. मागासवर्गिय कर्मचा-यांना खुल्या प्रवर्गातुन पदोन्नती देतांना ते आरक्षणाचा लाभ घेवुन पदोन्नतीच्या वरच्या पदावर आले असल्यास त्यांना दिनांक २५/०५/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार त्यांना खुल्या प्रवर्गातुन पदोन्नती देता येणार नाही करीता सा.प्र.वि. विभागाने केलेली कार्यवाही बरोबर असल्याने कनिष्ठ प्रशासन अधिकारी या पदावरील पदोन्नती करीता एक पद रिक्त ठेवण्या बाबत निर्देश दिले. | |

वरील प्रमाणे सुनावणीच्या अनुषगाने कार्यवाही करण्याबाबत निर्देश देवुन सुनावणी आक्षेपाचे तक्रार अर्ज निकाली काढण्यात आले.

[signature] २०७/२०

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वाशिम

प्रतिलिपी -

१.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम यांना माहीती करीता रवाना.
२.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद, वाशिम यांना माहीती करीता.
३.श्री.एम.जी.नायक वरिष्ठ सहाय्यक जि.ग्रा.वि.यं.वाशिम यांना माहीती करीता रवाना.
४.श्री.आर.एल.भगत वरिष्ठ सहाय्यक म.बा.क.जि.प.वाशिम यांना माहीती करीता रवाना.

जा.क. जि.प.सापवि/स्था 2020 / 2020
कार्यालय जिल्हा परिषद वाशिम
दि. 26/06/2020